Shailesh Tilak
General Secretary
Datta Aphale
Secretary- T. C.

MAHARASHTRA JUDO ASSOCIATION
महाराष्ट्र ज्युदो संघटना
Affiliated to Judo Fedration of India & Maharashtra Olympic Association
Trust Registration Number: F-3967 Mumbai

568, Narayan Peth, Tilak Wada, Pune- 411 030; gs.mahajudo@gmail.com; +91-94220 29656

17 डिसेंबर 2024, पुणे

प्रति,
माननीय सचिव
सर्व संलग्न आणि आमंत्रित संघटना

विषय:- महाराष्ट्र राज्य कॅडेट राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा 2024-25, मुंबई

महोदय / महोदया,

ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे प्रसृत परिपत्रकानुसार कॅडेट (मुली आणि मुले) या राष्ट्रीय स्पर्धा शिव छत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे दिनांक 22 ते 25 जानेवारी 2025 दरम्यान आपण आयोजित करणार आहेत. डेरवण येथे 51 वी राज्य स्पर्धा दि. 04 ते 06 ऑक्टोबर 2024 दरम्यान आपण आयोजिल्या होत्या आणि या स्पर्धेसाठी कॅडेट गटाचे जन्मसाल 2007, 2008 आणि 2009 हे घेतले होते. याच वर्षांप्रमाणे भारतातील इतर राज्यांनीही याच पद्धतीने त्यांच्या राज्य स्पर्धा घेतल्या होत्या. परंतू फेडरेशनने कॅडेट गटाच्या राष्ट्रीय स्पर्धांसाठी 2008, 2009 आणि 2010 हे जन्मसाल निश्चित केले असल्याने आपल्याला त्यानुसार म्हणजे 2008, 2009 आणि 2010 वर्षांप्रमाणे निवड चांचणी स्पर्धा घ्याव्या लागणार आहेत. सदरील राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र 'बी' चा संघ या वर्षांनुसार निवडला जाणारा असून ही निवड स्पर्धा आपण तातडीने आयोजित करत आहोत.

सदरील निवड स्पर्धेचा अंतिम कार्यक्रम खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

स्पर्धास्थान: मुंबई (निवास आणि स्पर्धास्थान आयोजकांकडून माहिती आल्यावर लगेचच कळविले जाईल.)
राज्य कॅडेट गट निवड चांचणी स्पर्धा:- दिनांक 28 आणि 29 डिसेंबर-2024
रिपोर्टिंग:- सर्व खेळाडूंनी दिनांक 28 डिसेंबर-2024 रोजी संध्याकाळी 04 वाजेपर्यंत मुंबई येथील स्पर्धास्थानी पोहोचणे आवश्यक आहे.
वजने:- दिनांक 28 डिसेंबर-2024 रोजी संध्याकाळी 06 ते 07 दरम्यान
व्यवस्थापकांची बैठक:- दिनांक 28 डिसेंबर-2024 रोजी संध्याकाळी 07.30 वाजता. याच बैठकीत लॉट्स टाकले जातील.
स्पर्धा प्रारंभ:- दिनांक 29 डिसेंबर-2024 सकाळी 08.00 वाजल्यापासून पुढे स्पर्धा संपेपर्यंत.

एन्ट्री फॉर्म सोबत जोडलेला असून तो व्यवस्थित टाईप करून दिनांक 21 डिसेंबर 2024 पर्यंत महाराष्ट्र असोसिएशनच्या वेबसाईटवर (www.mahajudo.com) अपलोड करावा यासह आपला एन्ट्री फॉर्म महासचिव यांना त्यांच्या ई-मेल आयडीवरदेखील (gs.mahajudo@gmail.com) मेल करावा.

**सदरील स्पर्धा या राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा असल्याकारणाने आपणास विनंती की,**
1. आपल्या दृष्टीने ज्या स्पर्धकांना राज्याच्या संघात निवडल्या जाण्याची शक्यता अधिक आहे अशांचीच नावे आपण निवड चांचणी स्पर्धेसाठी पाठवावी.
2. सदरील निवड चाचणी स्पर्धा असल्या कारणामुळे खेळाडूंच्या सहभागासंदर्भात स्पर्धकाना कोणतेही सहभाग/पदक विजेते प्रमाणपत्र अथवा पदक/मेडल दिले जाणार नाही.
3. स्पर्धेसाठी निवास, भोजन आणि प्रवास खर्च **हा प्रत्येक खेळाडूला वैयक्तिकरित्या करायचा आहे** याची कृपया नोंद घ्यावी.

या निवड चांचणी स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. **राज्य संघात निवडल्या गेलेल्या खेळाडूला ज्याने फेडरेशनचे रजिस्ट्रेशन केलेले नाही त्यांनी हे रजिस्ट्रेशन ताबडतोब करावे**.

जिल्ह्याच्या प्रवेशिकेबरोबर एन्ट्री बरोबर खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ दाखले आणि त्याच्या झेरॉक्स प्रति जमा कराव्यात यासह आपण राज्य स्पर्धेला जन्म तारखेच्या दाखल्या संदर्भातले सर्व नियम इथे लागू होतील.
एंट्री फॉर्मवर अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी जन्मतारखेच्या दाखल्यांसह द्यावा.

- एंट्रीबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती जमा कराव्यात तसेच एक पासपोर्ट आकाराचा फोटो जमा करावा.
- मूळ कागदपत्रे पाहिल्यावर झेरॉक्स दाखले प्रमाणित करून MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील आणि मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेचच दिली जातील.

